# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.08.2025** **वार:शुक्रवार**

1. देशातील शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी
3. अमेरिकेच्या वाढीव आयात शुल्काच्या परिणामांबाबत मुख्यमंत्र्यांनी घेतला उच्चस्तरीय बैठकीत आढावा
4. सोलापुरातील राजेंद्र अंकम संत कबीर हातमाग राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित आणि
5. हर घर तिरंगा अभियानानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

**<u>शेतकरी-मोदी</u>**

देशातील शेतकऱ्यांचं हित महत्वाचं असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करणार असल्याचं ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. हरित क्रांतीचे प्रणेते एम.एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. डॉ. स्वामिनाथन यांनी भारताला अन्नाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठीच्या चळवळीचं नेतृत्व केलं, असंही मोदी यांनी सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले......

**हमारे लिए अपने किसानों का हित सर्वोच्च प्राथमिकता है। भारत अपने किसानों के, पशुपालकों के, और मछुवारे भाई-बहनों के हितों के साथ कभी भी समझौता नहीं करेगा। और मैं जानता हूं व्यक्तिगत रूप से मुझे बहुत बड़ी कीमत चुकानी पड़ेगी, लेकिन मैं इसके लिए तैयार हूं। मेरे देश के किसानों के लिए, मेरे देश के मछुआरों के लिए, मेरे देश के पशुपालकों के लिए आज भारत तैयार है।**

यावेळी स्वामीनाथन यांच्यावरील नाण्याचं आणि टपाल तिकिटाचं अनावरण पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं काल उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 21 ऑगस्ट असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख 25 ऑगस्ट आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी गेल्या महिन्यात राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झालं आहे. देशातली उपराष्ट्रपतीपदाची ही 17वी निवडणूक असून 9 सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे.

**<u>राहुल गांधी</u>**

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी काल पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर टीका केली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी दरम्यान मोठ्या प्रमाणावर गडबड करण्यात आल्याचं गांधी यांनी म्हटलं आहे. दरम्यान राहुल गांधी यांचं वक्तव्य म्हणजे संविधानिक संस्थांचाच नाही, तर मतदारांचा अपमान असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे; तर याबाबत राहुल गांधी यांनी आपलं म्हणणं प्रतिज्ञापत्रावर देण्याची मागणी निवडणूक आयोगाने केली आहे.

**<u>मुख्यमंत्री-अमेरिका</u>**

अमेरिकेने वाढवलेल्या आयात शुल्काचा महाराष्ट्रावर काय परिणाम होऊ शकतो, याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी; काल; त्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्या समवेत उच्चस्तरीय बैठक घेतली. वित्त

विभागातील वरिष्ठ अधिकारी, आणि या क्षेत्रातील तज्ञ यावेळी उपस्थित होते. या बैठकीत जीडीपी, रोजगार, वाणिज्य आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्राथमिक चर्चा झाली. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे राज्यातील निर्यातप्रधान उद्योगांवर संभाव्य परिणाम, तसंच जागतिक बाजारातील स्पर्धात्मकतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची गरज असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**ओबीसी-मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल गोव्यात 'राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या दहाव्या राष्ट्रीय महाअधिवेशनाचं उद्घाटन झालं. राज्य शासनानं ओबीसी समाजाच्या हिताचे 50 महत्त्वाचे निर्णय घेतले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं, ते म्हणाले.....

**आमच्या ओबीसी समाजाच्या मुलांना मुलींना शिक्षणाकरता त्या ठिकाणी हॉस्टेल असेल किंवा ज्यांना हॉस्टेल मिळत नाही त्यांच्याकरता आपण साठ हजार रुपये त्यांना देण्याची योजना सुरू केली ती योजना असेल या योजनेच्या माध्यमातनं आमच्या मुलांकरता शिक्षणाची दारं खुली केली.**

**पुरस्कार-राजेंद्र अंकम**

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्ताने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी काल नवी दिल्लीत संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले. हातमाग कलाकुसरीतून नवनवीन प्रयोग करणाऱ्या सोलापुरातील राजेंद्र अंकम यांना या कार्यक्रमात संत कबीर हातमाग राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. सुती वॉल हँगिंग, गालिचे यांच्यावर चित्र विणण्याच्या कौशल्यासाठी अंकम यांना हा पुरस्कार मिळाला आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना राजेंद्र अंकम म्हणाले...

**मी गेल्या दिड-एक वर्षापासून दोऱ्याने फोटो वगैरे बनवतो आपण, हॅन्डलूमचं काम करीत गेलो आणि संत कबीर नावावरच ही आवड घेत असतात मी संत कबीरच फोटो तयार केलो ते फोटो बनवून मी त्या आवाजसाठी दाखल केलं होतो, आणि आपण महाराष्ट्राचं नाव आणून टाकलो माझा जिद्द होता की महाराष्ट्राला आपला अवॉर्ड मिळावा म्हणून आणि सोलापूर जिल्ह्याचा कृपाने हा अवॉर्ड घेतला आहे.**

**हर घर तिरंगा**

येत्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात हर घर तिरंगा मोहीम राबवण्यात येत आहे. यानिमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविदयालयांमध्ये या निमित्तानं विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आलं आहे. नागपूर महानगर पालिकेच्या वतीनं येत्या 12 ऑगस्ट रोजी सकाळी साडेपाच वाजता “तिरंगा मॅरेथॉन” होणार आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हर घर तिरंगा मोहिमेबाबत बोलताना म्हणाले....

**हर घर तिरंगा या कार्यक्रमाअंतर्गत हा तिरंगा घराघरामध्ये आणि मनामनामध्ये लहरला पाहिजे यासाठी आम्ही नियोजन केलेलं आहे त्याचबरोबर आम्ही या कार्यक्रमासोबत यावेळेस संविधानाचं सुद्धा जनजागरण मोठ्या प्रमाणामध्ये सुरू आहे आणि संविधानाची उद्देशिका घराघरापर्यंत पोहोचण्याचा घरघर संविधान हा कार्यक्रम आम्ही सध्या राबवतो आहोत.**

**महसूल मंत्री-धाराशिव**

आगामी काळात महसूल विभाग जनतेच्या 35 विषयावर काम करणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत प्रतिपादन केलं. ऐकुया याबाबतचा सविस्तर वृत्तांत........

**महसूल विभागाच्या माध्यमातून पवन चक्क्यांसंदर्भात राज्यस्तरीय धोरण तयार करणार, शेत रस्ते पानंद रस्ते शिव रस्ते हे सर्व रस्ते महसूल यंत्रणेने ताब्यात घेऊन बारा फुटाचे तयार करून त्यावर झाडे लावणार, तसेच एक जिल्हा एक खरेदीखत या योजनेअंतर्गत आता जिल्ह्यातल्या कोणत्याही तालुक्यात जिल्ह्यातील प्रॉपर्टीचे खरेदीखत करता येणार असून आगामी काळात एक राज्य एक खरेदी खत या अनुषंगाने राज्यातील कोणत्याही तालुक्यातील कोणत्याही जिल्ह्यातील खरेदीखत कोणत्याही जिल्ह्यात करता येणार असल्याचं महसूल मंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या सर्व खरेदी खतांना आधार कार्डशी जोडून रजिस्ट्री पूर्ण करण्यात येणार आहे, महसूल विभागात आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार असून या विभागाची कार्यक्षमता वाढवणार असल्याचं महसूलमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.**

**<u>राज्यपाल राखी</u>**

नारळी पौर्णिमेचा सण आज राज्यात उत्साहात साजरा करण्यात येत आहे. दरम्यान राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांना काल आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेली राखी बांधली. दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगरपालिके अंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी काल राज्यपालांना राखी बांधली.

**<u>आराखडा-बीड</u>**

सामाजिक न्याय विभाग आणि बीड जिल्हा परिषदेच्या संयुक्त प्रयत्नातून ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल झालं. मिशन साथिया असं या योजनेचं नाव आहे. त्याद्वारे ऊसतोड कामगारांच्या टोळीमधल्या एका महिलेला आरोग्य सेवेचं प्रशिक्षण आणि आरोग्य किट देण्यात येणार आहेत. अशा एक हजार किटचं वितरणही काल करण्यात आलं. हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत हरित बीड अभियानाचा प्रारंभही पवार यांच्या हस्ते काल झाला.

**<u>रन आदिवासी-नंदुरबार</u>**

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून नंदुरबार जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगेतील दुर्गम भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी काल 'रन फॉर आदिवासी' मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातील 609 खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

**<u>उत्तराखंड</u>**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या भीषण भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे राज्याच्या विविध भागातील 151 पर्यटक अडकले आहेत. त्यापैकी 120 पर्यटकांशी संपर्क झाला असून ते आयटीबीपी कॅम्पमध्ये सुरक्षित आहेत. उर्वरित 31 पर्यटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**<u>अपघात-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ काल सकाळी झालेल्या अपघातात चार विद्यार्थी मृत्यूमुखी पडले. तर अन्य दोघे जखमी झाले. त्यानंतर संतप्त नागरिकांनी हा महामार्ग रोखून धरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 4 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये पावसाचा अंदाज असून तुरळक ठिकाणी मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.